३१८१

**त्वरीत**

जा. क्र. माध्य-३/१४/नमाशा/मान्यता/पुवि/
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
यांचे कार्यालय
दिनांक:- 8 AUG 1990

प्रति,

सचिव,
प्रेरणा शिक्षण संस्था, लक्ष्मणनगर
थेरगांव ता. मुळशी जि. पुणे

विषय:- १९९०-९१ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत......

संदर्भ:- शासन पत्र क्र. एसएसएन-१०९०/२२६५-माशि-१
दिनांक:- १३.७.९०

शासनाचे संदर्भीय पत्रान्वये आपल्या संस्थेला नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्यावर घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद म्हणून खालील दर्शविलेल्या ठिकाणी माध्यमातून विना अनुदान तत्वावर/~~कायम विना अनुदान~~ तत्वावर " विशेष बाब" म्हणून जून १९९० पासून नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास, अनुदान संहितेच्या नियमानुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खालील नमूद केलेल्या विशेष अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवरच परवानगी देण्यात येत आहे.

**विशेष अटी:-**

अ] या नविन माध्यमिक शाळांना [ इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त] शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एसएसएन-१०८८/१६६९एन/ माशि-१ दि. १०. २. ८९ अन्वये विहित केलेल्या नविन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

ब] सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे [ उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत इ. ] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

क] सदर संस्थांची अर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

ड] इंग्रजी माध्यमांच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्यकाळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यांत येणार नाही वा अर्थिक दृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [ इ. बी. सी. च्या ] फीच्या ~~परताव्याची मागणी करण्यांत येणार नाही. अशा आशयाचे संस्थेच्या~~ अध्यक्षाचे सहीचे लेखी हमीपत्र संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालकांनी मागवून घेऊन कायम स्वरूपाचे कागदपत्र म्हणून ते सुरक्षितपणे जतन करुन ठेवावे.

**इतर अटी:-**

१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमाखाली नोंदणी आवश्यक आहे.

२.........

२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखादया शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधीत संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या त[...] आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

ह्या बाबींपैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असल[...] दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजले जाईल.

| अ.नं. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १] | प्रेरणा शिक्षण संस्था लक्ष्मणनगर, धोरगांव | लक्ष्मणनगर धोरगांव ता. मुळशी | आठवी | मराठी |

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता [...] ३.१. नुसार शाळा सुरू झाल्यापासून एक महिन्याचे आत विहित प्रपत्रात अ[...]

तसेच मंडळाची प्रथम मान्यतेकरिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व [...] माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची पध्दती मधील नियम २८ मधील १ ते १५ पर्यंत विहित केलेल्या नियमाप्रमाणे व प्रपत्रात अर्ज करावा.

स्थळ प्रतीवर मा.शि.उ.सं. यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे-१ क[...]

प्रतिलिपी:- शिक्षणाधिकारी [माध्य.] जिल्हा परिषद ---पुणे----- यांन[...] माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषीत.......

त्यांनी वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देवून पत्रात नमूद के[...] अटी व बाबी संस्था पूर्ण करते किंवा नाही याची तपासणी करून अहवाल त[...] या कार्यालयास पाठवावा. तसेच संस्थेविरुध्द तक्रारी व गैरव्यवहाराची उदाह[...] आपल्या कार्यालयास प्राप्त झाले असल्यास त्या विषयी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सदर नविन माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची का[...] तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणा-या अधिका-[...] तपासणी करून आपल्या अभिप्रायासह तपासणी अहवाल त्वरीत या कार्यालया[...] पाठविण्याची व्यवस्था करावी.

प्रतिलिपी:- मा. अवर सचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग मंत्रालय, विस[...] भवन मुंबई-३२ यांना त्याचे वरील संदर्भांकित पत्रान्वये माहितीस[...] सादर.

प्रतिलिपी:- मा.शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य,पुणे-१ यांना माहितीसा[...] सादर....

क्र. : माध्य. ३ /१३/ ५ वी ते ७ वी / पुवि / २००० ७५९७८

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे -१, यांचे कार्यालय

दिनांक :

प्रति,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद पुणे

विषय - इ. ५ वी ते ७ वी चे वर्ग माध्यमिक शाळेत सुरू करण्यास परवानगी देणेबाबत.

शाळा : - प्रेरणा माध्यमिक विद्यालय, लक्ष्मणनगर, येरगाव

संदर्भ :- आपले पत्र क्र. शिक्षणा/माध्य/... पुणे/२२/२०००

उपरोक्त विषयाधीन संदर्भाच्या पत्रान्वये कळविण्यात येते की, सन १९८३-८४ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी दिलेल्या नवीन माध्यमिक शाळांना इ. ५ वी ते ७ वी चे वर्ग नव्याने सुरू करण्यास परवानगी देण्याबाबत शासनाचे पत्र क्र. एसएसएन/१०९७/[५२८]/९७/माशि-१, दिनांक १/३/९९. ~~एसएसएन/१०८५/२३४८५/(२४४एम) माशि-१, दिनांक २९-१-८६ व २०-१२-८८~~ च्या शासन आदेशानुसार विभागीय शिक्षण उपसंचालकांना अधिकार प्रदान केलेले आहेत.

२/- सदर अधिकारांच्या अधिन राहून, खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर प्रेरणा शिक्षण संस्था, येरगाव या संस्थेच्या प्रेरणा माध्य. विद्यालय लक्ष्मणनगर, येरगाव. या माध्यमिक विद्यालयांत इ. ५ वी ~~ते ७ वी चे~~ च्या वर्ग सुरू करण्यास सन २००० या शैक्षणिक वर्षापासून विना अनुदान तत्त्वावर परवानगी देण्यात येत आहे.

अटी - १) इ. ५ वी ते ७ वी चे वर्गाची परवानगी ही विनाअनुदान तत्त्वावर राहील.
२) मा. शा. संहिता नियम ३.२ नुसार सर्व अटींची पूर्तता शाळेने करणे आवश्यक आहे.
३) वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन आदेश / नियम संस्थेवर बंधनकारक राहतील.

वरीलप्रमाणे संबंधितांस कळवावे. शाळेने सुरू केलेल्या सदर वर्गाची तपासणी वार्षिक तपासणीचे वेळी करावी व त्याबाबातचे योग्य ते अभिप्राय तपासणी अहवालामध्ये नमूद करावेत.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे -१ करिता

प्रत - १) मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय, विस्तारभवन मुंबई ३२, यांना सविनय सादर

२) मुख्याध्यापक, प्रेरणा माध्य. विद्यालय, लक्ष्मणनगर, येरगाव.